RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६४

दि. २८ जून २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# टीईटी पेपरफुटीचा पर्दाफाश

## दिल्लीहून भिवंडीत आणला पेपर, दीड कोटींच्या व्यवहारापूर्वी तिघांना अटक

**ठाणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ च्या आदल्या दिवशीच पेपरफुटीचा धक्कादायक प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. टीईटी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा दीड कोटी रुपयांमध्ये व्यवहार होणार असल्याची गुप्त माहिती भिवंडी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून कारवाई करत तीन आरोपींना अटक केली. आरोपी दिल्लीहून प्रष्नपत्रिका घेऊन भिवंडीत आले होते.




अटक करण्यात आलेले आरोपी बिहार, हरियाणाचे : पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत राजीव शाह (बिहार), आकाश कुमार (बिहार) आणि धीरज सिंग (हरियाणा) यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून मोबाईल फोन, रोख रक्कम तसेच टीईटी २०२६ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे चार संच जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास भिवंडी पोलीस करत आहेत. अधिकाऱ्यांकडून प्रश्नपत्रिकेची पडताळणी : जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये या प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष टीईटी परीक्षेतील असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास वेगानं सुरू आहे.

हे आरोपी भिवंडीत कोणाच्या संपर्कात आले होते? त्यांच्या मागे मोठं रॅकेट कार्यरत आहे का? तसेच या प्रकरणात कोणते स्थानिक एजंट किंवा शैक्षणिक संस्थांचा सहभाग आहे का? याचा पोलीस सखोल तपास करत आहेत. पेपरफुटीचा मुख्य सूत्रधार आणि आर्थिक व्यवहारांचाही तपास सुरू आहे.

TET परीक्षा पुढे ढकलली : दरम्यान, या गंभीर प्रकाराची दखल घेत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं रविवारी (२८ जून) होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं परिषदेकडून सांगण्यात आले. या घटनेमुळे राज्यभरातील लाखो परीक्षार्थ्यांमध्ये नाराजीचं वातावरण पसरलं आहे.

पेपरफुटीच्या या प्रकारामुळे पुन्हा एकदा राज्यातील परीक्षा व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. पोलिसांकडून आता या संपूर्ण रॅकेटच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू असून पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## लोकहितासाठी ५५ पॅन्थर्स युवा संघटन लातूर तालुका महिला आघाडीचा स्तुत्य उपक्रम - NCMC कार्ड नोंदणी शिबिरास सुरवात



**लातूर/प्रतिनिधी :** व्ही एस पॅन्थर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. विनोद भाऊ खटके यांच्या सूचनेनुसार महिला आघाडीच्या वतीने करीम नगर येथे NCMC (National Common Mobility Card) कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सामान्य नागरिकांना NCMC कार्ड काढण्यासाठी दिवसभर रांगेत उभे राहावे लागू नये, त्यांचा वेळ व श्रम वाचावेत आणि ही प्रक्रिया अधिक सोपी व्हावी, या उद्देशाने हा कॅम्प आयोजित करण्यात आला. परिसरातील अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला आणि महिला आघाडीच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे स्वागत केले.

सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे मा. विनोद भाऊ खटके यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही एस पॅन्थर्स युवा संघटना आणि महिला आघाडी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असून, हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. जनतेची सेवा हाच आमचा संकल्प या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामुळे नागरिकांचा वेळ वाचला, अनावश्यक गर्दी टळली आणि NCMC कार्ड नोंदणीची प्रक्रिया सुलभ झाली.कार्यक्रमाचे आयोजन मुस्कान शेख ता.अध्यक्ष लातूर, नंदनी घोडके ता.उपाध्यक्ष, लक्ष्मीपुरी ता सचिव,नाझिया शेख शाखाध्यक्ष करीमनगर, जरीना सय्यद (VS शिवण क्लास प्रशिक्षक) व करीमनगर महिला आघाडी शाखेने केले आहे. व्हीएसपॅन्थर्सयुवासंघटन – महिलाआघाडीलातूरतालुका जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर!

## महाविहार सातकर्णी नगर येथे आज विशेष धम्मदेशना



**लातूर/प्रतिनिधी :** जेष्ठ निज पौर्णिमेनिमित्त महाविहार, सातकर्णी नगर, लातूर येथे रविवार, दि. २८ जून रोजी दुपारी १२.०० वाजता विशेष धम्मदेशनेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात नांदेड येथील महिला भिक्खुणी चारूशिला थेरी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. चारूशिला थेरी यांचे बालपण कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील रेकुळगी माऊंट, मन्नाकेली येथील स्वर्गीय पूज्य भदंत महाकाश्यप महाथेरो यांच्या अनाथपिंडक बुद्ध विहारात घडले. त्यानंतर त्यांनी श्रीलंकेत दोन ते तीन वर्षे वास्तव्य करून बौद्ध धम्म, विनय आणि संस्कृतीचा सखोल अभ्यास केला. सध्या त्या नांदेड येथे वास्तव्यास असून बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करीत आहेत. अभ्यासू, विनयशील व विनम्र व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेल्या आर्याजी चारूशिला थेरी यांची धम्मदेशना ऐकण्याची संधी लातूरकरांना उपलब्ध होत आहे. या विशेष कार्यक्रमास सर्व बौद्ध उपासक-उपासिका तसेच धम्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्मदेशनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक भिक्खु पय्यानंद थेरो, लातूर यांनी केले आहे.

## तुम्हाला संघाबद्दल जाहीरपणे बोलायचं असेल तर सेवेचा राजीनामा द्या, विश्वास नांगरे पाटलांवर राज ठाकरे संतापले

**मुंबई/प्रतिनिधी :** धडक कार्यपद्धती आणि वक्तृत्व कलेसाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांची नागपूरचे पोलीस आयुक्त म्हणून बदली होताच नवीन वाद उद्भवला. सकल हिंदू समाजाच्या संमेलनात प्रमुख वक्ता म्हणून बोलताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी गौरवोद्गार काढल्याची चित्रफीत प्रसारित झाली आहे. यावरून सर्व स्तरांतून टीका होत असताना आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनीही त्यांचा समाचार घेतला. त्यांनी याबाबत समाज माध्यमांवर पोस्ट लिहिली आहे.



## व्ही एस पँथर्स ऑटो युनियन च्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :**येथील व्ही एस पँथर्स ऑटो युनियनच्या वतीने छत्रपती शाहू महाराज चौकातील पूर्ण कृती पुतळ्याला ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी छत्रपती शाहू महाराजांचा विजय असो अशा प्रकारच्या घोषणांनी परिसर दणाणून निघाला. यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक रवी कुरील जिल्हा उपाध्यक्ष विलास कसबे पप्पू सोनवणे राहुल बोडके भाऊसाहेब येमले नितीन रणदिवे शहर उपाध्यक्ष संजीव सुरवसे शिवकुमार जानराव यांच्यासह आयोजन उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव बोरी च्या वतीने पल्स पोलिओ जनजागृती फेरी



**शिरूर अनंतपाळ:** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने पल्स पोलिओ जनजागृती फेरी काढण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांनी दोन थेंब पोलिओचे रक्षण करेल बाळाचे अशा घोषणा दिल्या यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे पालक अमोल काळे अंगणवाडी सेविका रेणुका गायकवाड, शाळेतील शिक्षिका श्रीमती शितल काळे यांच्यासह मुख्याध्यापक रवी कुरील आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## महामार्गाची 'कोंडी'तून सुटका!

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी नियमितपणे वाहने उभी केली जातात. त्यामुळे तिथे बेकायदा वाहनतळ निर्माण होऊन वाहतूक कोंडी होण्यासोबतच अपघातांचा धोका वाढतो. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अशा ५९५ बेकायदा वाहनतळांवर कारवाईची देशव्यापी मोहीम हाती घेतली असून, त्यात पुणे जिल्ह्यातील काही ठिकाणांचा समावेश आहे. या मोहिमेमुळे महामार्गावरील प्रवास विनाअडथळा आणि सुरक्षित होणार आहे.देशभरात राष्ट्रीय महामार्गावर बेकायदा वाहनतळांची समस्या गंभीर बनली आहे. अनेक ठिकाणी वाहने महामार्गाच्या शेजारी वाहने उभी केली जातात, तसेच अतिक्रमणे केली जातात. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन वाहनचालकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होते.

या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने देशभरात सर्वेक्षण केले. त्यात देशभरात ५९५ बेकायदा वाहनतळ समोर आले. यानंतर प्राधिकरणाने राज्य सरकारे, जिल्हा प्रशासन आणि इतर शासकीय यंत्रणांशी समन्वयातून बेकायदा वाहनतळांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यासाठी जिल्हा महामार्ग सुरक्षा कृती पथक स्थापन केले जाणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' चा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करुन नियमानुसार विहित वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एक रक्कमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे थकीत पीक कर्ज असल्यास, शासनाच्या निकषांमध्ये बसणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार असल्याची माहिती श्री. पोतंगले यांनी दिली.

माहिती अपूर्ण असल्यामुळे कोणताही पात्र शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद पूर्ण करावी. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## उपवर्गीकरणाविरोधात लातूरात ६ जुलैला भव्य महामोर्चा; ५० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होणार

**लातूर/प्रतिनिधी :**अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये प्रस्तावित उपवर्गीकरणाच्या विरोधात अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती, आंबेडकरवादी पक्ष-संघटना तसेच संविधानवादी नागरिकांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी लातूर येथे 'अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा' आयोजित करण्यात आल्याची माहिती आज पत्रकार भवन, लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा समिती लातूरच्या वतीने देण्यात आली.




हा महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सकाळी सुरू होऊन जुने जिल्हाधिकारी कार्यालय (जिल्हा परिषद गेट) येथे धडकणार आहे. मोर्चामध्ये अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचे प्रतिनिधी, आंबेडकरवादी संघटना, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक घटक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचे उपवर्गीकरण होऊ नये, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण व्हावे आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व अबाधित राहावे, ही या महामोर्चाची प्रमुख भूमिका असल्याचे समितीने स्पष्ट केले.

महामोर्चाच्या माध्यमातून राज्य शासनाकडे अनुसूचित जातींसाठी शासकीय सेवांमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला अनुशेष तात्काळ भरावा, सर्व रिक्त आरक्षित पदे विशेष भरती मोहिमेद्वारे भरण्यात यावीत तसेच अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे प्रभावी संरक्षण करण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. या महामोर्चाला रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कॅबिनेट मंत्री बबनराव घोलप, हे उपस्थित राहणार आहेत तसेच कॅबिनेट माजी कॅबिनेट मंत्री राजकुमार बडोले व सबंध लातूर जिल्ह्यातील सर्व आंबेडकरवादी पक्ष संघटनेचे चळवळीतील नेते कार्यकर्ते या महामोर्चाला उपस्थित राहणार आहेत

लातूर जिल्ह्यातील विविध समाजघटकांचा या आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळत असून सुमारे ५० हजार ते १ लाख नागरिक या महामोर्चात सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. हा महामोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आणि संविधानिक पद्धतीने आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेमार्फत अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती, आंबेडकरवादी पक्ष-संघटना, संविधानवादी नागरिक तसेच सामाजिक न्यायावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व नागरिकांना दि. ६ जुलै रोजीच्या महामोर्चात मोठ्या संख्येने लातूर जिल्ह्यातील सर्व खेड्यापाड्यासह सर्व तालुक्यातून हजारो लाखो समाज बांधवांनी या मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. या पत्रकार परिषदेस अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा समिती लातूरचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

# तंत्रज्ञानामुळे अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदलाचे संकेत !

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केलेले महा-एआय मॉडेल महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील एक क्रांतिकारी पाऊल ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर उच्चभ्रू वर्गापुरता मर्यादित न ठेवता, तो तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत आणि प्रशासनापर्यंत पोहोचवून राज्याच्या अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवणारे हे ऐतिहासिक धोरण म्हणूनच गेमचेंजर! महा-एआय हे निव्वळ एक तांत्रिक मॉडेल नसून; ती महाराष्ट्राच्या भौगोलिक, सामाजिक आणि भाषिक गरजांनुसार विकसित केलेली प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली आहे. महाराष्ट्र हे भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या देशातील विस्तीर्ण, वैविध्यपूर्ण आणि गुंतागुंतीचे राज्य. एवढ्या मोठ्या राज्याचा कारभार पारंपरिक लालफितीच्या आणि मानवी हस्तक्षेपाच्या बळावर हाकणे आता कोणत्याही सरकारला शक्य राहिलेले नाही. इथेच महा एआयची भूमिका निर्णायक आणि पथदर्शी ठरणार आहे. सरकारच्या विविध विभागांकडे असलेला अब्जावधी डेटा, योजनांची माहिती आणि नागरिकांच्या नोंदी यांचे एकाच छताखाली अचूक विश्लेषण करून, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया जलद आणि अचूक करण्याचे काम हे मॉडेल करेल. सामान्यांना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आता महिनोन्महिने कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागणार नाहीत. एआयच्या माध्यमातून अचूक फाईल ट्रॅकिंग, त्वरित तक्रार निवारण आणि योजनांची थेट व पारदर्शक अंमलबजावणी या सर्व गोष्टींमध्ये कमालीची गती येईल. भ्रष्टाचारमुक्त आणि खऱ्या अर्थाने स्मार्ट गव्हर्नन्सचे हे देशातील एक सर्वोत्कृष्ट उदाहरण ठरेल. प्रशासकीय पारदर्शकतेसोबतच, समाजात अनेकदा जाणीवपूर्वक पसरवला जाणारा एक चुकीचा समजही या मॉडेलमुळे मोडीत निघणार आहे. एआयसारखे अत्याधुनिक नवतंत्रज्ञान हे फक्त श्रीमंतांसाठी, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांसाठी आणि आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या उच्चभ्रू वर्गापुरतेच मर्यादित आहे, हा तो गैरसमज होय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महा एआयच्या माध्यमातून हाच भ्रम मोडून काढला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वाधिक आणि थेट फायदा हा विशेषतः शेतकऱ्यांना, मजुरांना आणि सर्वसामान्यांना होणार आहे. महा-एआय मुळे राज्यातील कोणत्याही दुर्गम भागातील शेतकरी आपल्याच मायबोलीत, म्हणजेच अस्सल मराठीत किंवा स्थानिक बोलीभाषेत थेट एआय प्रणालीशी संवाद साधू शकेल. पिकांवरील रोगराई, हवामानात होणारे बदल, मातीचे अचूक परीक्षण, खतांचा योग्य वापर आणि कृषी मालाचे बाजारातील अद्ययावत भाव या सर्व गोष्टींची वैज्ञानिक आणि अचूक माहिती शेतकऱ्याला एका क्लिकवर उपलब्ध होईल. याव्यतिरिक्त, ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये प्राथमिक निदानासाठी आणि विद्यार्थ्यांच्या दर्जेदार, वैयक्तिकृत शिक्षणासाठी हे तंत्रज्ञान एक मोठे वरदान ठरणार आहे. तंत्रज्ञानाचे हे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण आहे, असे म्हटले तर ते फारसे चुकीचे ठरणार नाही. काळाची पावले वेळीच ओळखण्यात आणि नव्या बदलांना सामोरे जाण्यात महाराष्ट्र नेहमीच देशात आघाडीवर राहिला आहे, हे यातून पुन्हा एकदा सिद्ध होते. इतर राज्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्राथमिक विचार करत होती, तेव्हाच महायुती सरकारने महाराष्ट्राचे एक स्वतंत्र आणि सर्वंकष एआय धोरण आखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली. नागपूरसारख्या शहरात आयआयएमच्या मदतीने स्वतंत्र एआय केंद्र उभारण्याची घोषणा असो किंवा दावोसच्या जागतिक आर्थिक परिषदेत जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान कंपन्यांशी केलेले कोट्यवधींचे करार असोत, महायुती सरकारने या क्षेत्रात मोठी आघाडी घेतली आहे. आरोग्य, कृषी, शिक्षण आणि दळणवळण या चार प्रमुख स्तंभांवर एआयचा वापर कसा करता येईल, यासाठी सरकारने आधीच एक स्पष्ट रोडमॅप तयार करून ठेवला आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि सायबर सुरक्षेतही एआयचा अत्यंत प्रभावी वापर आता राज्यात सुरू झाला आहे. हे सर्व पाहता, महायुती सरकारने केवळ पोकळ घोषणा न करता, तंत्रज्ञानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत संपूर्ण देशाचे नेतृत्व केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. कोणत्याही राज्याच्या शाश्वत आणि वेगवान प्रगतीसाठी त्या राज्याच्या नेतृत्वाकडे एक अत्यंत स्पष्ट आणि भविष्यवेधी दृष्टी असावी लागते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आजच्या भारतीय राजकारणातील मोजक्या अशा प्रगल्भ नेत्यांपैकी एक आहेत, जे नवतंत्रज्ञानापासून दूर न जाता त्याला थेट भिडतात. जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात कोणकोणत्या नवीन घडामोडी सुरू आहेत, याची त्यांना सखोल जाण आहे. बदलत्या तंत्रज्ञानाची भीती न बाळगता, त्या तंत्रज्ञानाचा राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरी हितासाठी प्रभावी वापर कसा करून घेता येईल, याची एक अत्यंत स्पष्ट दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे. पारंपरिक राजकारणाच्या आणि जातिपातीच्या चौकटीतून राज्याला बाहेर काढून, थेट २१व्या शतकातील आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात नेण्याचे त्यांचे हे धाडसी पाऊल, त्यांच्या प्रगल्भ आणि अत्यंत आधुनिक नेतृत्वाची साक्ष देते. एआयच्या आगमनामुळे मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या जातील, अशी एक नकारात्मक चर्चा सतत केली जाते. मात्र, वास्तवात या नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या पारंपरिक पद्धती बदलल्या, तरी नवीन आणि अधिक उत्पादक रोजगाराच्या अमर्याद संधी निर्माण होणार आहेत. महा-एआयच्या या भक्कम परिसंस्थेमुळे मुंबई-पुण्यातच नव्हे, तर छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर अशा टियर-२ शहरांमध्येही शेकडो नवनवीन एआय स्टार्टअप्स उभे राहतील. डेटा ॲनालिटिक्स, प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग, मशिन लर्निंग अशा अनेक नव्या आधुनिक क्षेत्रांमध्ये तरुणांसाठी हजारो नोकऱ्यांची दारे खुली होतील. तसेच राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना या तंत्रज्ञानामुळे जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि गती गाठता येईल, ज्यामुळे त्यांच्या निर्यातीत मोठी वाढ होईल. एकीकडे सरकारी प्रशासकीय खर्चात होणारी अब्जावधींची बचत आणि दुसरीकडे उद्योगांच्या वाढत्या कार्यक्षमतेमुळे राज्याच्या जीडीपीला एक मोठा बूस्ट मिळेल. महाराष्ट्राला वन ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याच्या दिशेने हे मॉडेल खऱ्या अर्थाने गेमचेंजर ठरणार आहे. महा-एआय हे निव्वळ तांत्रिक साधन नसून; तो नव्या, प्रगत आणि आत्मनिर्भर महाराष्ट्राचा अधिकृत जाहीरनामा आहे, असेच म्हणावे लागेल. संकुचित विचारांच्या भिंती ओलांडून, प्रत्येक नागरिकाच्या हातात प्रगतीचे शक्तिशाली अस्त्र देण्याचे काम या मॉडेलच्या माध्यमातून होणार आहे. फडणवीस यांनी दाखवलेली ही धोरणात्मक दूरदृष्टी प्रशासकीय पातळीवरच नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक पातळीवरही महाराष्ट्राला जागतिक मंचावर एक महासत्ता म्हणून निश्चितपणे प्रस्थापित करेल. तंत्रज्ञान आणि मानवी कल्याणाची घातलेली ही

# मुंबईतील मोहरम मिरवणुकीत घातपाताचा मोठा कट उधळला

**मुंबई/प्रतिनिधी :** मोहरमच्या मिरवणुकीदरम्यान मुंबईत मोठा अनर्थ घडवण्याचा आणि लोकांचे प्राण धोक्यात आणण्याचा एक धक्कादायक कट मुंबई पोलिसांनी अत्यंत सतर्कतेने उधळून लावला आहे. पोलिसांनी या कारवाईत तब्बल १४ हजार ९०० विषारी कॅप्सूल जप्त केल्या असून, या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक केली आहे. अटक करण्यात आलेला आरोपी पुण्याचा रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, सुरक्षा यंत्रणा कमालीच्या सतर्क झाल्या आहेत. यात दहशतवादी घातपाताचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई पोलिसांच्या सतर्कतेमुळं उधळला डाव : दक्षिण मुंबईतील भायखळा परिसरात सुरू असलेल्या मोहरमच्या मिरवणुकीत या गोळ्यांचं वाटप करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली. त्याच्याकडून १४ हजार ९०० विषारी गोळ्या जप्त करण्यात आल्यात. या गोळ्यांच्या सेवनामुळं काही तरुणांची प्रकृती बिघडली असून, एकाची प्रकृती गंभीर असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती मुंबई पोलीस उपायुक्त जयंत मीणा यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

विषारी गोळ्या तयार केल्याची धक्कादायक कबुली : पोलीस उपायुक्त जयंत मीणा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''या प्रकरणी अटक करण्यात आलेला फैय्याज प्रेमजी (३९) हा मूळचा पुण्यातील विमाननगर परिसरातील रहिवासी आहे. पोलिसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली असता, त्याच्याकडं तब्बल १४ हजार ९०० तयार कॅप्सुल आढळून आल्यात. फैय्याजनं एकाचवेळी अनेक नागरिकांना मोठी हानी पोहोचवण्याच्या हेतूनं ऑनलाईन मागवलेलं ५० किलो झिंक फॉस्फाईड हे विषारी रसायन आणि ३० हजार कॅप्सूलच्या ऑर्डरचे पुरावे सापडलेत. या आरोपीनं प्रत्येक कॅप्सुलमध्ये एक ग्रॅम झिंक फॉस्फाईड मिक्स करून या विषारी गोळ्या तयार केल्याची धक्कादायक कबुली दिली.

मुंबईत भायखळा परिसरात सुरू असलेल्या मोहरमच्या मिरवणुकी दरम्यान आरोपीनं मोफत गोळ्यांचं वाटप केलं होतं. यासाठी त्यांनी कोणतीही परवानगी घेतली नव्हती. यावेळी मुंबई पोलिसांनी गोळ्या जप्त केल्या. या गोळयांच्या सेवनामुळं काही तरुणांची प्रकृती बिघडली. याप्रकरणी फैय्याज प्रेमजीला ताब्यात घेऊन अटक केली. त्यांनी झिंक फॉस्फाईड हे विषारी रसायन आणि ३०,००० कॅप्सूलच्या ऑर्डर केले होते.'' - जयंत मीणा, मुंबई पोलीस उपायुक्त

लोन वुल्फ अटॅकचा प्रकार असल्याचा पोलिसांना संशय : सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या आरोपीनं गेल्यावर्षी इराण आणि इराक या देशांचा दौरा केल्याची माहिती समोर आलीय. त्यामुळं या कृत्यामागे त्याचा नक्की काय हेतू होता? आरोपीचे काही आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनशी कनेक्शन आहे का?, या दिशेनं आता मुंबई पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. आरोपीनं एवढ्या मोठ्या प्रमाणावर विषारी गोळ्या का तयार केल्या?, यामागे त्याचा नेमका हेतू काय होता? या सर्व बाजूंनी मुंबई पोलीस कसून तपास करत असल्याचं उपायुक्त मीणा यांनी स्पष्ट केलं. प्राथमिक तपासात या घटनेमागे आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या लोन वुल्फ अटॅक (ज्यामध्ये एकच व्यक्ती कोणाच्याही मदतीशिवाय सर्वसामान्य नागरिकांना टार्गेट करून मोठा हल्ला करतो) असा काही भयंकर प्रकार तर नाही ना? या दिशेनंही तपास सुरू आहे. याबद्दल अधिक माहिती देताना पोलीस उपायुक्त जयंत मीना यांनी सांगितलं, ''आरोपीने ठराविक लोकांना टार्गेट करत मोठी हानी पोहोचवण्याच्या उद्देशानं ऑनलाईन पद्धतीनं तब्बल ३० हजार रिकाम्या कॅप्सूल आणि झिंक फॉस्फाईड ऑर्डर केलं होतं.''

कशी झाली फैय्याजला अटक? : शुक्रवारी पार पडलेल्या मोहरमच्या मिरवणुकीत सहभागी झालेल्या काही लोकांना तीव्र पोटदुखी आणि उलट्यांचा त्रास सुरू झाला. या सर्वांनी या गोळ्यांचं सेवन केल्याचं समजताच या लोकांनी इतरांच्या मदतीनं रात्रीच पोलिसांत तक्रार दाखल केली होती. चौकशी केल्यानंतर पोलिसांना कळलं की, मिरवणुकीत सहभागी झालेल्यांना एक व्यक्ती पेन किलरच्या नावाखाली या गोळ्या मोफत वाटत होती. त्यामुळं गोळ्या वाटणाऱ्या व्यक्तीवर संशय आल्यानंतर भायखळा पोलिसांनी तातडीनं तपासाची चक्र फिरवली. आरोपीचा मोबाईल नंबर लोकेशनच्या आधारे शोधून रात्रीच त्याला त्याच्या घरातून ताब्यात घेतलं. त्यावेळी त्याच्या घरातील झडतीत १५ हजार कॅप्सूल आणि जवळपास ५० किलो उंदीर मारण्याचं विषारी औषध (झिंक फॉस्फाईड) जप्त करण्यात आलं. जर या सर्व गोळ्या लोकांमध्ये वाटल्या गेल्या असत्या तर शेकडो नागरिकांचा जीव धोक्यात आला असता. पोलिसांच्या माहितीनुसार, सुरूवातीच्या चौकशीत या केवळ पेन किलर गोळ्या असल्याचं सांगून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, यात घातपाताची शक्यता असल्यानं मुंबई पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी सुरू केली.

# बळीराजाला देतेय बळ

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६




महाराष्ट्रातील बळीराजाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्याला पुन्हा एकदा स्वाभिमानाने उभे करण्यासाठी राज्य शासनाने नुकतेच ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना जाहीर करण्यात आली असून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' असे या योजनेचे नाव आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

३६ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेची कर्जमुक्ती

या योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी मंजूर केली आहे. या अवाढव्य आर्थिक तरतुदीमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि शेती क्षेत्राला गती देण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

योजनेचे मुख्य निकष आणि लाभ

२ लाखांपर्यंत कर्जमाफी: ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या पात्र शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिली जाणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन: जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून शासनाने विशेष तरतूद केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा: जुन्या कर्जाच्या बोज्यातून मुक्त झाल्यानंतर, शेतकऱ्यांना आता खरीप आणि रब्बी हंगामासाठी नव्याने पीक कर्ज मिळणे अत्यंत सोपे होणार आहे.

जमीनधारणेची अट नाही: या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लाभ देताना 'वैयक्तिक शेतकरी' हाच एकमेव निकष मानला गेला आहे. जमीनधारणेचा (जमिनीच्या क्षेत्राचा) कोणताही विचार न करता प्रत्येक पात्र शेतकऱ्याला या योजनेचा लाभ दिला जाईल.

सुलभ प्रक्रिया: स्वतंत्र अर्जाची गरज नाही!

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून शासनाने प्रक्रिया अत्यंत सुलभ ठेवली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कोणताही स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फक्त आधार प्रमाणीकरण ( ) पूर्ण करणे बंधनकारक असेल. आधार प्रमाणीकरण होताच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीचा लाभ वर्ग केला जाईल.

प्रभावी अंमलबजावणीसाठी उपसमितीची स्थापना

योजनेचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शकपणे आणि वेळेत पोहोचावा, यासाठी एका विशेष उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

आर्थिक अडचणींमुळे खचलेल्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा शेतात आत्मविश्वासाने उभे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' मुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांची चिंता मिटली असून, बळीराजा पुन्हा एकदा नव्याने समृद्धीच्या वाटेवर वाटचाल करण्यास सज्ज झाला आहे.

०००

**मनोज सुमन शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# लोकप्रतिनिधी समाजसेवक की नोकरदार?

भारतात राजकीय पक्ष नेत्या कडून ग्रामपंचायत ते लोकसभे पर्यत जे राजकीय लोक निवडणूकी द्वारे मतदार मतदान करतात तेव्हा ते निवडून देतात ते समाजसेवक, लोकप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जातात ते एकदा का निवडून आले की त्यांना मरे पर्यत पेन्शन आणि विविध सुविधा मिळतात. निवडून आलेला लोकप्रतिनिधी आमदार खासदार पन्नास हजार कोटी ला विकला जातो.त्याला मतदाराची कोणती ही भीती का वाटत नाही. सरकारी नोकरी किंवा खाजगी नोकरी करून ज्या सुविधा कामगार कर्मचारी अधिकारी यांना मिळत नाही त्यासर्व समाजसेवक,लोकप्रतिनिधी यांना मिळतात त्या सरळसरळ भारतीय संविधानांचा खून करून घेतल्या जातात.त्यात सर्वच राजकीय पक्ष आणि विचारधारा मानणारे पक्ष सहभागी आहेत.यावर सर्व सार्वजनिक ठिकाणी लोकलच्या डब्यात व एसटी बसेस मध्ये चर्चा होते.देशाच्या सर्वोच्च न्यायालयात एक पी.आय.एल दाखल झाली होती.

ती सोशल मीडियावर खूप वायरल झाली होती. त्यावर सर्व सामन्यात फक्त चर्चा झाली.पण राजकीय,सामाजिक न्यायांची अपेक्षा ठेवणाऱ्या एकाही पक्ष्याने त्यावर तोंड उघडले नाही.

भारताच्या प्रत्येक नागरिकांनी हा माझा देश आहे त्यांचा मला गर्व आहे असे म्हटले पाहिजे.गर्वाने सांगण्यासाठी तो तसा वागला पाहिजे की नाही?. तरच त्याला गर्वसे कहो हम भारतीय है असे म्हणण्याचा अधिकार असेल.विद्यार्थी दशे पासुन आम्हाला नागरीशास्त्र शिकविल्या जाते.ग्रामपंचायत ते सचिवालय ही प्रशासकीय यंत्रणा कशी कार्य करते.प्रत्येक नागरिकांना समान अधिकार समान संधी असते.

त्यावर अन्याय अत्याचार झाला तर तोच भारतीय भारतात आवाज उठवण्यासाठी सज्ज झाला पाहिजे. आज असे भारतात काही दिसत नाही.प्रचंड असमानता दिसत आहे.मतदारांना सर्वात मोठा अधिकार असतो तो फक्त एका दिवसा पुरता मतदान करण्याचा असतो. पण त्याच मतदारांनी निवडून दिलेला लोकप्रतिनिधी पांच वर्ष सरकारी तिजोरी मतदार संघाचा विकास करण्याच्या नावाखाली खुलेआम लुटतो. तिथे समान न्याय,समान संधी हे फक्त राजकीय पक्षांच्या नेत्यांनीच उपभोगावी.बाकी सर्व कामगार कर्मचारी शेतकरी शेतमजूर यांना कोणतीही समान संधी समान न्याय मिळत नाही. राजकीय शेतकरी दरवर्षी करोडो रुपयांचे उत्पन्न घेतो.खरा शेतकरी स्वता वावरत नांगर,तिफन,डवरे धरून निंदन खुरपणी करून पीक घेतो तरी त्यांचा खर्च निघत नाही, म्हणून तो कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो.

त्याला सवलती देतांना हेच लोकप्रतिनिधी सरकारच्या तिजोरी वर प्रचंड प्रमाणात बोजा पडेल म्हणून ओरडतात. मग या आमदारांना खासदारांना पेन्शन व इतर सवलती घेण्याचा काय अधिकार आहे. यांची आर्थिक परिस्थिती शेतमजूरांच्या पेक्षा खालची आहे काय?.ते आर्थिक दृष्ट्या दुबल घटक आहेत काय?.मग यांना पेन्शन देण्याची ही योजना कोणत्या निकषावर लावण्यात आली?.सर्व सभागृहाचे लोकप्रतिनिधी हे समाजसेवक असतांना.त्यांना नोकरदारा सारखे पेन्शन का असावे?.मतदान करणाऱ्या मतदारांना या लोकप्रतिनिधी ला जवाब विचारण्याचा अधिकार असला पाहिजे. त्यासाठी मतदान करतांना मतदारला मतदान केले याचा एक कागदी पुरावा मिळाला पाहिजे.

जसा मतदाराला मतदान करून उमेदवार निवडून देण्याचा अधिकार आहे तसाच निवडलेल्या लोकप्रतिनिधीने चुकीचे काम केले तर शिक्षा करण्याचा अधिकार असला पाहिजे.आज तो नसल्यामुळे आमदार खासदार विकल्या जात आहेत. त्यांना कोणाची भीती नाही,त्याने रातोरात पक्ष बदलला तरी त्याचे कोणी वाकडे करू शकत नाही. हे सर्वच पक्षात चालू आहे. म्हणजे मतदाराला काहीच किंमत राहिली नाही. हे थांबले पाहिजे.

भारतीय संविधानात दिलेली व्याख्या यांनी यांच्या सोयी नुसार बदलुन टाकली. म्हणूनच सर्व खासदारांना पेंशन मिळू नये.कारण राजकारण समाजसेवा आहे.म्हणजे नोकरी नाही.त्यामुळे नोकरी नाही तर वेतन नाही.राजकारण हे लोक प्रतिनिधित्व कायद्या अंतर्गत एक निवडणूक प्रक्रियेचा भाग आहे,त्याच्या सदस्यत्वास कोणतीही सेवानिवृत्ती नाही,परंतु सध्या त्यांना पाच वर्षांच्या सदस्यता नंतर पेन्शन मिळते.यात आणखी एक मोठा गोंधळ असा आहे की जर एखादी व्यक्ती नगरसेवक असेल तर मग तो आमदार बनतो आणि नंतर विधानपरिषद किंवा राज्यसभेचा सदस्य बनतो,मग त्याला तीन-तीन पेन्शन मिळतात.

तीन वेगवेगळ्या सभागृहात लोकप्रतिनिधीत्व करणाऱ्या या समाजसेवकाची आर्थिक परिस्थिती कशी आहे.यांची कायदेशीर नोंदवही सरकार कडे नसेल,पण गावांतील,मतदारसंघातील नागरिकांना चांगल्या प्रकारे माहिती असते. देशाच्या नागरिकांशी हा एक मोठा विश्वासघात आहे त्यामुळे त्यांची पेन्शन त्वरित बंद झाली पाहिजे.

त्यासाठी नागरिकांनाच पुढाकार घ्यावा लागेल.सेंट्रल पे कमिशनने, भारतीय संसदेच्या खासदारांचा भत्ता सुधारित करावा.पण ते नोकर नसल्याने त्यांचे वेतन बंद करावे.यांची अंमलबजावणी कायद्यानुसार करण्यासाठी टी एन शेषन सारखा उच्च दर्जाचा अधिकारी जन्माला आला पाहिजे.आमदार खासदारांना वाचक बसेल असा एकही संविधानाच्या चौकटीत काम करणारा अधिकारी नसल्यामुळेच सर्व पक्षीय आमदार खासदार स्वत:साठी मत देऊन. स्वत:चे वेतन आणि भत्ते वाढवतात आणि त्या वेळी सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधीचे या बाबत एकमत होते कोणतीही चर्चा न होता सर्व ठराव मंजूर होतात. म्हणजे हा भारतीय संविधानाचा सरळ सरळ खून आहे.



भारतीय नागरिकासाठी प्रत्येक तालुका,जिल्हा पातळीवर आणि प्रमुख शहरात राज्य व केंद्र सरकारचे सार्वजनिक आरोग्य सेवा देणारे रुणालय असतांना त्यात हे लोकप्रतिनिधी आरोग्य सेवा का घेत नाही?.भारतीय लाखो करोडो नागरिक सार्वजनिक रुग्णालयात दाखल होऊन उपचार करून घेतात तर मग आमदार खासदारांनी त्यांच्या सध्याच्या आरोग्य सेवा सुविधा भारतीय सार्वजनिक आरोग्य सेवा देणाऱ्या रुणालयाचा लाभ का घेऊ नये?.

आपल्या व्याधीवरील उपचार भारतात केले जावे.विदेशात उपचार केले जाऊ नये,जर करायचेच झाले तर ते आपल्या स्वतःच्या खर्चाने करावे.तेवढी खर्च करण्या जोगी त्यांची आर्थिक परिस्थिती निश्चित आहे.जर भारतातील मोफत सवलत,राशन,वीज,पाणी,फोनबिल सहित सर्व सेवांची पूर्णपणे उपभोग घेऊन ही त्यांचे आमदार खासदार यांचे मन शांत होत नसेल तर त्यांना त्यांची मतदार व भारतीय नागरिक म्हणून ओळख करून देणे खूप गरजेचे झाले आहे. त्यासाठीच जागरूक नागरिकांनी काही तरी केलीच पाहिजे.त्यांना आमदार खासदारांना इतक्या सवलती संविधानाच्या कायद्याने मिळत नाहीत.

तर नियमितपणे ते स्वतःच लोकप्रतिनिधी म्हणून या सवलती वाढऊन घेत आहेत.त्यामुळेच भारतात काही घराण्यातच राजकीय लोकप्रतिनिधीत्व मिळत राहते.त्याला सुरुंग कोणी तरी लावलाच पाहिजे. हे महाराष्ट्रातील मागासवर्गीय बहुजन समाज वंचित बहुजन आघाडी द्वारे करू शकतात.जर सरकारी,निमसरकारी,खाजगी नोकरी करून कामगार,कर्मचारी आणि अधिकारी वर्गाला साठ वर्ष नोकरी करून पेन्शन मिळत नसेल तर आमदार,खासदार यांना का देण्यात येत आहे?.ते लोकप्रतिनिधी समाजसेवक आहेत की नोकरदार?. याचा भारतातील नागरिकांनी मतदारांनी गांभीर्याने विचार केलाच पाहिजे.

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,भांडुप मुंबई.**

# बेकायदेशीररित्या लोटस ३६५ चा खेळ..!

## महादेव ॲप या नावाचा ऑनलाईन जुगार खेळणारे व खेळविणारे ८ आरोपी जेरबंद..!

## ८ लाख १५ हजार५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीला केले गजाआड



**केज/प्रतिनिधी :** येथील पोलीस ठाण्याच्या हाद्दीमध्ये विनापरवाना व बेकायदेशीर रित्या लोटस ३६५ नावाचे ऑनलाईन जुगार खेळणारे व खेळविणाऱ्या ८ गुन्हेगाराविरुद्ध कारवाई करून ८ लाख १४ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल विषेश पथकाने जप्त केला आहे.

गुरुवारी दिनांक २५ जून रोजी रात्री ९-३० वाजण्याच्या दरम्यान सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांना एका गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीती वरून पोलीस उपनिरीक्षक अमीरोद्दीन इनामदार, पोलीस हवालदार धोंडीराम योगीराज मोरे, राजु वंजारे, विशाल क्षिरसागर, अनिल मंदे, मिसबा इनामदार, मल्लीकार्जुन माने, पोलीस अंमलदार जरगर, मयुर टकले, यांच्या विशेष पथकाने अनंत नवनाथ खंदारे वय २३ वर्षे रा. कारेगव्हाण ता. जि.बीड, अक्षय अनिल गायकवाड वय २० वर्षे रा.सिंहगड रोड, हिंगणी खुर्द, माधव नगर, गणेश कॉलनी, घर क्र.३०जि. पुणे, अनिल कबीर सानप वय २३ वर्षे रा. सानपवाडी ता. जि.बीड, आसाराम बळीराम केकाण वय २५ वर्षे रा. दरडवाडी ता. केज, गणेश लक्ष्मण खंदारे वय २२ वर्षे रा. कारेगाव्हाण ता. जि.बीड, हर्षल मनोहर खंडारे वय २७ वर्षे रा. कौंडण्यपुर ता. तिवसा जि. अमरावती, सुशील दत्तात्रय मुंडे वय २४ वर्षे रा. कोठारबन ता. वडवणी,विशाल उत्तम बारवाळ वय २० वर्षे रा. पिंप्री एलोरा ता. खुलताबाद जि.छ. संभाजीनगर यांनी मिळून त्यांच्या सर्वाच्या आर्थिक फायद्याकरीता लोकांना जास्त पैसे मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन विनापरवाना बेकायेदशिररित्या लोटस ३६५ ॲपमध्ये विविध खेळावर ऑनलाईन जुगारखेळत व खेळवित असतांना वेगवेगळ्या कंपनिची ३४ मोबाईल, ४ मोटार सायकल, ३ वेगवेगळ्या कंपनिचे मोबाईल असे एकुण ८ लाख १४ हजार ५०० रुपयाचा माल मिळुन आल्याने त्याच्याविरुध्द जमादार धोंडीराम मोरे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याअनर्गत केज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आसून सदरील घटनेचा पुढील तपास हा केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार राजू वंजारे हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक वेंकटराम यांचे मार्गदर्शना खाली विशेष पथक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक अमीरोद्दीन इनामदार, पोलीस हवालदार धोंडीराम योगीराज मोरे, राजु वंजारे, विशाल क्षिरसागर, अनिल मंदे, मिसबा इनामदार, मल्लीकार्जुन माने, पोलीस अंमलदार जरगर, मयुर टकले, यांनी केली

### मा.मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख मा.उद्धवजी ठाकरे व आदित्यजी ठाकरे यांचे रविवारी केज शहरात भव्य स्वागत

#### शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-रत्नाकर शिंदे

**केज/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे परभणीहुन धाराशिव ला उद्या रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी जाताना केज शहरात दुपारी २-०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक केज येथे आगमन होणार आहे. त्यांच्या समवेत माजी मंत्री आदित्यजी ठाकरे,शिवसेना नेते संजय राऊत, शिवसेना सचिव अनिल देसाई, मिलिंदजी नार्वेकर, अंबादासजी दानवे, सुषमाताई अंधारे, परशुरामजी जाधव उपस्थित राहणार आहेत. तरी बीड जिल्हा व केज तालुका शिवसेनेच्या वतीने मा. उद्धवजी ठाकरे व आदित्यजी ठाकरे यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे तरी सर्व शिवसैनिकांनी उपस्थित राहवे असे आवाहन जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे सह केज तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात येत आहे.



### मा. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या स्वागताला निष्ठावंत शिवसैनिकांनी आज उपस्थित राहावे-अशोक जाधव

**केज/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे केज शहरात येणार असल्याने केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य स्वागताचे आयोजन करण्यात आले आहे तरी बीड जिल्ह्यातील व केज तालुक्यातील सर्व निष्ठावंत शिवसैनिक यांनी रविवार, दिनांक २८ जुन २०२६ रोजी ठीक १-०० वाजता केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांनी केले आहे.



परभणीचा कार्यकर्ता मेळावा संपल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्यासह वरिष्ठ नेते व पदाधिकारी हे पोहोचणार आहेत. परभणी वरून परळी,अंबाजोगाई, केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मा. मुख्यमंत्री पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे धावती भेट देऊन पुढे धाराशीव येथे निष्ठावंत शिवसैनिक यांच्या मेळाव्यात जाणार आहेत तरी केज तालुक्यातील सर्व निष्ठावंत शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे मत शिवसेना तालुका प्रमुख अशोक जाधव यांनी व्यक्त केले आहे.

### नागपुरात संतापजनक प्रकार: व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत शिक्षिकेचे लैंगिक शोषण!

**नागपूर/प्रतिनिधी :** खासगी शाळेत शिक्षिका असलेल्या एका विवाहित महिलेशी ओळख वाढवत तरुणाने तिच्याशी प्रेमाचे नाटक केले. नंतर बळजबरीने संबंध ठेवले. त्याचे चित्रिकरण करत ते व्हायरल करण्याची धमकी देत शोषणही केले आणि पैशांची लुबाडणूकही केली. हतबल झालेल्या शिक्षिकेने बजाजनगर पोलीस ठाणे गाठत तक्रार दिल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रणय दिवे असे आरोपीचे नाव आहे. त्याने एका खासगी शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत विवाहितेसोबत हा संतापजनक प्रकार केला. बजाजनगर पोलिस हद्दीतील एका खासगी शाळेत शिक्षिका कार्यरत आहे. तिचा पती एका जीमममध्ये प्रशिक्षक म्हणवून कार्यरत आहे. शिक्षिता विवाहित असून तिला दोन मुले देखील आहे. दोन वर्षापूर्वी शाळेत ध्वनी यंत्रणा कार्यान्वित करायची असल्याने शाळेने एका इव्हेंट कंपनीला विचारणा केली. त्यावर कंपनीने प्रणय दिवे याला पाठवले. त्याने कामा दरम्यान शिक्षिकेशी ओळख वाढवली. नंतर तिचा भ्रमणध्वनी क्रमांक घेतला. यादरम्यान दोघांमध्ये परिचय वाढला. त्यानंतर आरोपीने विश्वास संपादन करत शिक्षिकेकडून आधी १ लाख रुपये उसणे घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५३ वा राज्याभिषेक दिन रायगडावर उत्साहात साजरा

## रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य; गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस मान्यता देणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**रायगड-अलिबाग :** युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५३ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज दुर्गराज रायगडावर पारंपरिक उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून राज्य शासन कार्यरत असल्याचे सांगत रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी व्यासपीठावर रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष सुनील पवार, कोकण कडा मित्र मंडळ रायगडचे अध्यक्ष रोहित पवार, उपाध्यक्ष संकेत वडके तसेच लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आपल्या भाषणात दुर्गराज रायगडाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. रायगडावरील पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने मान्यता देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सन्मानाचा घालून दिलेला आदर्श शासनाच्या धोरणांत प्रतिबिंबित होत असून, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कोणत्याही अडथळ्यांशिवाय निरंतर सुरू राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यंदा पाऊस लांबल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देताना त्यांनी सांगितले की, कमी पाऊस किंवा दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली तरी शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शासकीय तिजोरीवर पहिला अधिकार अन्नदाता बळीराजाचाच आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तसेच, रायगडासह महाराष्ट्रातील युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त १२ ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि जागतिक स्तरावर त्यांची कीर्ती वृद्धिंगत करण्यासाठी शासन पूर्ण क्षमतेने कार्यरत राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रास्ताविकात रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी रायगड किल्ला आणि पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली. पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या 'शिवसृष्टी' प्रकल्पासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी शासनाने सुमारे ८० ते ८५ एकर जागा संपादित केली असून, आगामी मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पास अंतिम मान्यता देऊन निधीत वाढ करण्यात यावी.

रायगड किल्ल्यावरील सखल भागातील भिंती, तटबंदी आणि पडझड झालेल्या ऐतिहासिक संरचनांच्या दुरुस्तीसाठी केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, जेणेकरून संवर्धनाची कामे वेगाने पूर्ण होतील, अशी विनंतीही त्यांनी केली. तसेच, रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवरील पडझड झालेल्या विश्रामगृहाच्या जागी आधुनिक व सुसज्ज विश्रामगृह उभारण्यात यावे, जेणेकरून गडावर येणाऱ्या शिवभक्तांना अधिक चांगल्या मुक्कामाची सुविधा उपलब्ध होईल, अशी मागणी त्यांनी केली. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी केलेल्या समन्वयपूर्ण कार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

सोहळ्याच्या प्रारंभी रायगड पोलीस दलाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात पालखी सोहळा राजसदरेवर दाखल झाला. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ढोल-ताशांचा गजर, पोवाडे, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे, शिवप्रेमी पथकांचे आकर्षक कार्यक्रम आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या घोषणांनी संपूर्ण रायगड परिसर शिवमय झाला.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महावितरण तसेच विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, पार्किंग, सुरक्षा आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

## जळगावमधील पाचोऱ्यात खळबळ आर्थिक वादातून डॉक्टरवर चाकूहल्ला; काही वेळातच हल्लेखोराचा रेल्वेखाली मृत्यू

**जळगाव/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान हिंसक घटनेत झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. वादातून एका डॉक्टरवर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आल्यानंतर संबंधित व्यक्तीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ प्रसारित केला. आणि काही वेळातच नगरदेवळा स्थानकाजवळील रेल्वे मार्गावर त्याचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली असून, भडगाव पोलिसांसह रेल्वे पोलीस (जीआरपी) या प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, संभाजीनगरातील डॉ. समाधान पाटील आणि रवींद्र महाजन यांच्यात काही दिवसांपासून आर्थिक व्यवहारावरून मतभेद होते. शुक्रवारी सायंकाळी हा वाद डॉक्टरांच्या रुग्णालयात पोहोचला. सुरुवातीला दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी रवींद्र महाजन याने धारदार शस्त्राने डॉ. पाटील यांच्या हातावर वार केल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात डॉ. पाटील जखमी झाले असून त्यांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

व्हिडिओनंतर रेल्वे मार्गावर मृतदेह

हल्ल्याच्या घटनेनंतर रवींद्र महाजन याने सोशल मीडियावर एक व्हिडिओ प्रसारित केल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली आहे. त्या व्हिडिओतील मजकूर, त्यामागील परिस्थिती आणि तो संपूर्ण घटनाक्रमाशी कितपत संबंधित आहे, याची पडताळणी सुरू आहे. व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर काही वेळातच नगरदेवळा रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे मार्गावर एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. त्याची ओळख रवींद्र महाजन अशी पटली.

प्राथमिक माहितीनुसार रेल्वेखाली आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. मात्र, हा मृत्यू नेमक्या कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत अधिकृत माहिती तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

रेल्वे हद्दीत घटना; जीआरपीकडे तपास

घटनेची माहिती मिळताच भडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आवश्यक पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. मात्र, मृतदेह आढळलेले ठिकाण रेल्वे हद्दीत येत असल्याने या प्रकरणाच्या पुढील तपासाचा अधिकार रेल्वे पोलीस (जीआरपी) चाळीसगाव आहे. त्यामुळे आवश्यक नोंदी करून प्रकरण पुढील तपासासाठी रेल्वे जीआरपीकडे वर्ग करण्यात आले आहे. या प्रकरणात आर्थिक व्यवहाराचे स्वरूप काय होते, दोघांमधील वाद नेमका कोणत्या कारणावरून झाला, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओचा घटनाक्रमाशी काय संबंध आहे, तसेच डॉक्टरवरील हल्ला आणि त्यानंतर घडलेल्या रेल्वे मार्गावर आढलेल्या मृतदेहामागील सर्व परिस्थितीचा तपास रेल्वे पोलिसांकडून विविध अंगांनी सुरू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील सर्व बाबी स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# राजर्षि छत्रपती शाहूमहाराज बहुजनांचे आधारवड आणि उत्तम शासक व प्रशासक होते - डॉ.वसुदेव गायकवाड

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील आनंदगाव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालय येथे दिनांक २६ जुन २०२६ रोजी राजार्षि छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले. यावेळी ग्रंथवाचन कार्यक्रम व परिसंवाद घेण्यात आला.

तसेच बहुजनांचे आधारवड राजर्षि छत्रपती शाहू महाराज या विषयावर जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिध्द वक्ते डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले.



राजर्षि छत्रपती शाहु महाराज बहुजनांचे आधारवर आणि उत्तम शासक व प्रशासक होते असे प्रतिपादन डॉ. वसदेव बप्पा गायकवाड यांनी केले. राजार्षि छत्रपती शाहू महाराजांना कमकुवत घटकातील लेकरांसाठी शाळा, वसतीगृहे उभारली. सर्वांना याचा फायदा होईन व शिक्षणाची गंगोत्री सामान्यांच्या व बहुजनांच्या घरापर्यंत जाईल याची काळजी घेतली.

तसेच बहुजनांच्या विद्यार्थांसाठी त्यांनी शिष्यवृत्ती सुरु केली. त्यामळे अनेक बहुजनांची लेकरे पुढे आली. अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही परदेशी शिक्षणासाठी आर्थिक मदत केली, पुढे चालून याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची धर्मनिरपेक्ष घटना लिहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांना सांगायचे एक वेळेस माझी जयंती साजरी करू नका पण माझ्या राजर्षि छत्रपती शाहू महाराजांची जयंती दिपावली साजरी केल्याप्रमाणे घराघरात साजरी करा. असे रयतेसाठी कल्याणकारी कार्य करणारे राजर्षि छत्रपती शाहू महाराज महान व्यक्तीमत्व होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

अध्यक्ष स्थानी गौरी गायकवाड तर परिसंवादात व ग्रंथवाचनात ऋषीकेश गायकवाड, कृष्णराजे गायकवाड, दर्षद गायकवाड, श्रुती पुंड, प्रतिक गायकवाड, आनंद गायकवाड यांनी सहभाग घेतला.

दिनांक १९ जुन २०२६ रोजी राष्ट्रीय वाचन दिवस त ग्रंथवाचनाने साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे, पांडुरंग गायकवाड यांची उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानी कमलाकर साबळे होते. यावेळी लहाण - थोरांनी ग्रंथवाचन केले यात आनंद भैय्या गायकवाड,ए. बी. गायकवाड, जनार्धन गायकवाड, नारायण गायकवाड, कृष्णराजे गायकवार, गौरी गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाद, शिवराज जाधव, रामराजे गायकवार, आर्यन गायकवाड, यांनी ग्रंथवाचन केले.


## लातूर जिल्ह्यात डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या तयारीला प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या सार्वजनिक जयंती महोत्सव निमित्त लातूर जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, जयंती महोत्सव समितीच्या नवीन अध्यक्षपदाच्या निवडीसाठी रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही बैठक डॉ. अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळ्यासमोर, डॉ. अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, लातूर येथे होणार आहे. बैठकीत आगामी जयंती महोत्सवाचे नियोजन, नवीन अध्यक्षांची निवड तसेच विविध कार्यक्रमांच्या रूपरेषेवर चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकीस लातूर जिल्ह्यातील मातंग समाजातील सर्व प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी, समाजनेते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, महिला, युवक-युवती, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुयायी, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते तसेच समाजहिताची जाणीव असलेल्या सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले मार्गदर्शन, सूचना व सहकार्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ही बैठक साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे १०५ वी सार्वजनिक जयंती महोत्सव समिती (वर्ष २०२५-२६), जिल्हा लातूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आली असून, समितीचे अध्यक्ष श्री. सचिंद्र (नाना) बाबुराव कांबळे यांनी सर्व समाजबांधवांनी वेळेवर उपस्थित राहून बैठकीस यशस्वी करावे, असे आवाहन केले आहे.

## अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण : संविधानाला धरून की संविधानाविरोधात?




आरक्षण उपवर्गीकरनावर न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांचं कालच स्पष्ट मत:, अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण म्हणजे नेमकं काय,आणि त्याचा धोका काय? अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण : संविधानाला धरून की संविधानाविरोधात? हे काही मुद्दे कमी आणि समजेल अश्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न आहे.सोप्या भाषेत सांगायचं तर,अनुसूचित जातींना संविधानाने एकत्रितपणे आरक्षणाचा हक्क दिला आहे,कारण या सर्व समाजांनी शतकानुशतके अस्पृश्यता आणि सामाजिक अन्याय सहन केला आहे.हा हक्क जाती-जातीत विभागून देण्यासाठी नाही. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बेला एम.त्रिवेदी यांनी स्पष्ट मत मांडलं की संविधानाच्या अनुच्छेद ३४१ नुसार अनुसूचित जातींची यादी एकसंध आहे. राज्य सरकारांना त्यात उप-वर्गीकरण करून ''या जातीला जास्त, त्या जातीला कमी'' असं ठरवण्याचा अधिकार नाही.हे समजण्यासाठी एक साधं उदाहरण समजा एका घरातील ५ भावांना वडिलांनी समान हक्काने जमीन दिली. आता बाहेरचा कुणीतरी येऊन म्हणाला की ''मोठ्या भावाला जास्त, लहानाला कमी'' तर तो वडिलांच्या निर्णयात हस्तक्षेपच ठरेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे प्रतिनिधित्व आणि ऐतिहासिक न्यायासाठी आहे, अंतर्गत फूट पाडण्यासाठी नाही. उप-वर्गीकरणाच्या नावाखाली समाजाला तुकड्यांत विभागण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचा सर्वात मोठा फटका सामूहिक राजकीय आणि सामाजिक ताकदीला बसेल. आज गरज आहे ती हक्क टिकवण्याची,एकजूट मजबूत करण्याची आणि संविधानाचा मूळ हेतू समजून घेण्याची.विभाजन नव्हे,संघटन हाच मार्ग आहे. तसंच,बाबासाहेबांनी संविधानातून दिलेला हक्क हा सर्व अनुसूचित जातींसाठी समान न्यायाच्या तत्त्वावर आहे. दुसरं उदाहरण - जर एका संघाची ताकद १०० लोकांची असेल आणि त्यांना १०-१० च्या गटात भागून एकमेकांविरुद्ध उभं केलं, तर त्या संघाची ताकद कमी होते. उप-वर्गीकरणाचं राजकारण हे असंच काम करतं एकजूट तोडतं. लक्षात ठेवा,आरक्षण हा दयेचा विषय नाही; तो ऐतिहासिक अन्यायाची भरपाई आहे.आज जर आपण ''आपली जात वेगळी,आपला हिस्सा वेगळा'' म्हणत विभागलो, तर उद्या संपूर्ण आरक्षण व्यवस्थेलाच कमकुवत करण्याचा मार्ग मोकळा होईल.हक्क टिकवायचे असतील तर एकत्र राहावं लागेल.विभाजनाच्या राजकारणाला बळी पडू नका.संविधान वाचा, समजा आणि हक्कांसाठी सजग राहा.

## नाईक बाईंच्या भेटीची वेळ ठरली! ऐश्वर्या नारकरांसह झळकणार ही प्रसिद्ध अभिनेत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** आमच्या लाडक्या नाईक बाई या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत लोकप्रिय अभिनेत्री ऐश्वर्या नारकर. त्यांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. याशिवाय त्यांनी आजवर ज्या-ज्या मालिकांमध्ये काम केलंय, त्या सगळ्या सिरियल गाजल्या आहेत. एका सामान्य शिक्षिकेची, तिच्या कुटुंबाची आणि तिच्या मुलींची गोष्ट सांगणारी ही मालिका असणार आहे. मुख्य भूमिकेत ऐश्वर्या नारकर असल्यामुळे या मालिकेला नक्कीच दमदार टीआरपी मिळणार असा अंदाज चाहत्यांनी याची पहिली झलक पाहूनच बांधला होता. आता समोर आलेल्या नव्या प्रोम ोतून या मालिकेच्या प्रदर्शनाची वेळ अन् तारीख जाहीर करण्यात आली आहे.

# नि:स्वार्थ ज्ञानदान, समाज प्रबोधन आणि मानवतावादी मूल्यांची जपणूक करणारा मार्गदर्शक म्हणजे प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख

## लातूरच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयात विविध संघटना आणि प्राध्यापकांनी प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांना अर्पण केली सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे आधाररवड व अमरावती पदवीधर मतदार संघांचे सलग पाच वेळा प्रतिनिधित्व केलेले आमदार प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांचे शुक्रवार दि.१९ जून २०२६ रोजी दुख:द निधन झाले. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील समस्त प्राध्यापकांच्यावतीने दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी प्रास्ताविक करताना डॉ.अमोल लाटे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांनी नुटा व एमफुक्टो प्राध्यापक संघटनेच्या माध्यमातून शिक्षक चळवळीत काम करताना वेतनश्रेणीतील सुधारणा, सेवा संरक्षण, निवृत्तीवेतन लाभ, १९९४चा विद्यापीठ कायदा, विद्यापीठीय सुधारणांचा लाभ, शैक्षणिक धोरणांमध्ये प्राध्यापकांना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण संघर्ष केला. शिक्षक चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी ''नुटा बुलेटीन'' हे प्रभावी माध्यम उभारले.

प्राचार्य डॉ.संग्राम मोरे म्हणाले की, आपल्याला मिळालेले वैभव हे केवळ प्रा.बी.टी.(भाऊ) यांच्यामुळे मिळाले आहे. पाचव्या वेतनामध्ये ग्रंथपालाचा समावेश असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ते हक्काच्या भाषेसोबत कर्तव्याची जाणीवही करून द्यायचे. त्यांच्या विचाराचा वारसा आपल्याला भविष्यामध्ये चालवायचा आहे.

डॉ.दीपक चाटे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांच्या निधनाची बातमी ही मनाला वेदना देणारी होती. सैनिक ज्याप्रमाणे सीमेवर लढतात त्यामूळे आपण शांत झोपू शकतो अशाच प्रकारचे कार्य त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभर केले. त्यांनी तीस वर्ष विधान परिषदेचे सदस्य म्हणून प्रतिनिधित्व केले. शैक्षणिक कार्यासोबत जलसिंचनाचे कार्य सुद्धा अत्यंत प्रेरणादायी आहे. प्रा.बी.टी.(भाऊ) म्हणजे निस्वार्थ, प्रामाणिक आणि कार्यनिष्ठ जपणारे व्यक्तिमत्व होतं.

डॉ.सतीश यादव म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी आपले संपूर्ण आयुष्य संघटनेच्या उभारणीसाठी घालविले आहे. चळवळीचा कार्यकर्ता हा सच्चा आणि सात्विक असावा असे त्यांचे मत होते. ते राजकीय दृष्ट्या अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वांना परिचित होते. आज आपल्यामध्ये भाऊ नाही परंतु आपल्या मधूनच अनेक भाऊ तयार व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

विश्वंभर भोसले म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांच्या सोबत अनेक बैठकांना उपस्थित राहण्याचा योग आला. त्यावेळी ते अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करायचे. त्यांनी आयुष्यभर वैयक्तिक काम कधीही कुणाला सांगितले नाही तर सातत्याने समाजाचे प्रश्न त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला. आज आपल्याला शिक्षण वाचवा, देश वाचवा यासाठी लढावे लागणार आहे.

डॉ.वाय.पी.सारणीकर म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी प्राध्यापकांच्या संरक्षणासाठी सातत्याने कार्य केले. संप कालावधीतला पगार सुद्धा त्यांच्या अथक परिश्रमामुळेच सर्वांना मिळाला.

डॉ.जयद्रथ जाधव म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) म्हणजे संघटनेचा मुख्य आधारवड होता. विधानसभा व विधान परिषदेमध्ये त्यांनी निस्वार्थ नेतृत्व केले. आजही त्यांची निष्ठा आणि कर्तुत्व आपल्या सर्वांसमोर आहे. आज आपण आपले मतभेद, मनभेद आणि स्वार्थ बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. त्यांच्या भाषणामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये सामर्थ्य निर्माण होत असे.

डॉ.विष्णू पवार म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी विधान परिषदेमध्ये शिक्षकासोबतच् शेतकरी आणि शेतमजुरांचे सुद्धा प्रश्न मांडले. त्यांची वाणी अलौकिक होती, त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक सुद्धा त्यांचे भाषणे एकाग्रतेने ऐकायचे.

डॉ.महेश बेंबडे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख हे सर्वव्यापी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाजातील सर्व प्रश्नांना विधिमंडळामध्ये वाचा फोडली आणि शिक्षण क्षेत्रामध्ये एक नवा पॅटर्न त्यांनी निर्माण केला.

यावेळी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.डी.आर.भूरे यांनी केले.

सर्वात शेवटी दोन मिनिट स्तब्ध राहून प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# उद्धव ठाकरेंकडून पहिला उमेदवार जाहीर

## फुटीर खासदारांच्या मतदारसंघातून मोठी घोषणा

**वाशिम/प्रतिनिधी :** राज्यातील ऑपरेशन टायगरमुळे उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाला मोठा धक्का बसला असून ६ खासदारांच्या फुटीनंतर उद्धव ठाकरेंसह शिवसेना उबाठा पक्षाच्या नेत्यांनी फुटीर खासदारांच्या मतदारसंघात दौरा सुरू केला आहे. उद्धव ठाकरेंनी सर्वप्रथम खासदार संजय दिना पाटील यांच्या ईशान्य मुंबईत जाहीर सभा घेऊन दौऱ्याला सुरुवात केली होती. त्यानंतर, आज वाशिम-यवतमाळ लोकसभा मतदारसंघात जाऊन उद्धव ठाकरेंनी खासदार संजय देशमुख यांच्यावर हल्लाबोल केला. यावेळी, वाशिम विधानसभा मतदारसंघातून डॉ. सिद्धार्थ देवळे यांची उमेदवारीच जाहीर केली आहे.



मी निघालो दौऱ्याला आणि बातम्या सुरु झाल्या, काहींनी कोल्हेकुई सुरू केली, उद्धव ठाकरे फिरत नाही, शिवसेना संपली. म्हणून म्हटलं आता शिवसेना दाखवतो, कडवट शिवसैनिक कुठेही गेला नाही तो तिथेच आहे. तुम्ही आमदार खासदार निवडून दिले, आता गद्दारीला थारा द्यायचा नाही, नमक हरामीला थारा द्यायचा नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी फुटीर खासदारांवर तोफ डागली. मिंदे पासून हे सगळे नमक हराम, हरामखोर आहेत, हे लुटारू माजले आहेत, राम मंदिर लुटायला लागले आहेत. बाबरी पडली तेंव्हा हे सगळे शेपूट घालून पळाले होते, शौर्य आणि भाजप हे दोन्ही विरुद्ध अर्थी शब्द आहेत. मंदिर वही बनायेंगे म्हणाले, शिवसेना प्रमुख फिरले नसते तर काळ्या कुत्राने भाजपला विचारलं नसतं, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी वाशिम दौऱ्यात भाजपवरही हल्लाबोल केला.

आता हिंदुत्वशी गद्दारी झाली आहे, फक्त उद्धव ठाकरेंसोबत झाली नाही, राम मंदिरचा मुद्दा, आपल्याशी गद्दारी केलेला मुद्दा सोडता येणार नाही. भाजपचं हिंदुत्व भोंदुत्व आहेत, आमचं हिंदुत्व हाताला काम, शेतकऱ्याला दाम देणार हिंदुत्व आहे. मी मतदारांची माफी मागायला आलो आहे, तुम्ही आपले ९ खासदार मशाल चिन्हावर निवडून दिले. निशाणी शेवटच्या पंधरा दिवसात मिळाली होती, या माणसाने गद्दारी आधी सुद्धा केली होती. आईच्या नावाने खोटं बोलले, मी जेव्हा खासदारांची मिटींग बोलावली होती, तेंव्हा यांची खोक्यांची बोलणी सुरु होती, हा सोयारिक जुळवत होता, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी संजय देशमुख यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

शेतकरी आत्महत्या करतोय, वाशिम-यवतमाळमध्ये जास्त आत्महत्या झाल्या आहेत. हे कर्जमाफी म्हणताय, माफी ही गुन्हेगाराला द्यायची असते शेतकरी गुन्हेगार नाही. त्यामुळे, कर्जमाफी नाही कर्जमुक्ती करा, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. नमक हराम मिंदे तिकडे बसले, ते विचारणार आहेत का तिकडे? असा सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला.

सिद्धार्थ देवळे तुम्ही तयारीला लागा

नमक हराम जरी गेला तरी मी हरणार नाही, थांबणार नाही, तुमच्यासारखे शिवसैनिक माझ्या सोबत आहेत. संकटच्या छातडावर बसून त्याच्यावर भगवा फडकवणारी शिवसेना आहे. तुमचा खासदार तुम्हाला जिथे दिसेल तिथे त्याला जाब विचारा, त्याची जशी भाषा तसा जाब विचारा. मुंबईचा एक खासदार पत्रकाराला बोलला म्हणून त्याला पण तसा जाब विचारा, असे म्हणत शिवसैनिकांना उद्धव ठाकरेंनी आवाहन केले. तसेच, डॉ. सिद्धार्थ देवळे किती मत मिळाली होती? आतापासूनच तुम्ही तयारीला लागा, तीन वर्ष तुमच्या हातात आहेत, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी एकप्रकारे सिद्धार्थ देवळेंची उमेदवारीच जाहीर केल्याचं दिसून आलं. दरम्यान, वाशिम मतदारसंघातून सिद्धार्थ देवळेंना शिवसेना महाविकास आघाडीचे तिकीट देण्यात आले. मात्र, भाजपच्या श्याम खोडे यांच्याकडून त्यांचा निसटता पराभव झाला होता.

आम्ही कामातून उत्तर देऊ - संजय राठोड

जो गरजते है वो बरसते नही अशा शब्दात मंत्री संजय राठोड यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या यवतमाळ दौऱ्याबाबत आणि ऑपरेशन तुडवाबाबत टीका केली. कोणी कितीही धमक्या दिल्या, टीका टिपणी केली तरी त्याचे उत्तर आम्ही कामाने देऊ. आम्ही ४० आमदारांनी उठाव केला होता, त्याचे ६० आमदार झालो, अजूनही संख्या वाढत आहे. शिवसेनेत बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर विश्वास ठेवून अनेकजण यायला तयार आहेत. आगामी काळात अनेक प्रवेश शिवसेनेत बघायला मिळतील. त्यामुळे कुणाच्याही टीकेला उत्तर न देता आम्ही काम करत राहू, असे संजय राठोड यांनी उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यानंतर म्हटले.

## लातूरमध्ये 30 जून रोजी एकल महिला धोरणाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेशीर, आरोग्यविषयक व पुनर्वसनासंदर्भातील प्रश्नांचा सर्वकष विचार करून त्यांच्यासाठी स्वतंत्र व प्रभावी धोरण तयार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा केली होती. त्यानुसार राज्यस्तरीय मसुदा समिती गठित करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिक, एकल महिला, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती व संबंधित विभागांचे अधिकारी यांच्याकडून सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी मंगळवार, ३०जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, लातूर येथे जिल्हास्तरीय बैठक व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये प्रामुख्याने रोजगार व उपजीविका, मालमत्ता व वारसा हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा व पुनर्वसन, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील सुधारणा, नवीन योजना व उपक्रमांविषयीच्या अपेक्षा, कायदेशीर अडचणी, पोटगी, न्यायालयीन दिरंगाई व प्रलंबित खटल्यांमधील सुधारणा, एकल महिलांची सुरक्षितता आणि सामाजिक सहभाग वाढवून रूढी-परंपरांमधील अडथळे दूर करणे या विषयांवर सविस्तर चर्चा करून अभिप्राय गोळा केले जाणार आहेत. या जिल्हास्तरीय बैठकीत प्राप्त होणारे नागरिकांचे अभिप्राय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्यामुळे जिल्ह्यातील संबंधित घटकांनी, अभ्यासकांनी आणि माध्यम प्रतिनिधींनी या कार्यशाळेस लेखी स्वरूपात सूचनांसह उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# लातूर आरटीओची परराज्यात नोंदणीकृत प्रवासी बसेसवर धडक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परराज्यात नोंदणी असलेल्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवासी बसेसवर कडक कायदेशीर कारवाईची धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतुदींनुसार, एखादे वाहन मूळ नोंदणीकृत राज्याव्यतिरिक्त दुसऱ्या राज्यात निश्चित कालावधीपेक्षा जास्त काळ वापरले जात असल्यास, संबंधित राज्यात त्या वाहनाची पुर्ननोंदणी करणे आणि लागू असलेला स्थानिक मोटार वाहन कर भरणे कायद्याने बंधनकारक असते. परंतु, अनेक परराज्यात नोंदणीकृत असलेली वाहने महाराष्ट्र राज्यात आणि विशेषतः लातूर परिसरात दीर्घकाळ कर न भरता व नियमांचे उल्लंघन करून वापरात असल्याचे निदर्शनास येत होते.

या बाबीचा गांभीर्याने विचार करून राबविण्यात आलेल्या या मोहिमेमध्ये प्रामुख्याने परराज्यातील प्रवासी वाहनांद्वारे केली जाणारी करचुकवेगिरी, तसेच प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या आपत्कालीन दरवाजा समोर अडथळे निर्माण करणे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या कारवाई अंतर्गत लातूर आरटीओच्या वायुवेग पथकाद्वारे मोठी कामगिरी बजावण्यात आली असून, यामध्ये माहे मे २०२६ मध्ये ४८ दोषी वाहनांवर कारवाई करून ७ लाख ५७ हजार ०९९ रुपये दंड वसूल करण्यात आला, तर माहे जून २०२६ मध्ये १७ दोषी वाहनांवर कारवाई करत ५ लाख ९२ हजार ७६५रुपये इतका एकूण दंड वसूल करण्यात आला आहे. परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशानुसार परराज्यात नोंदणीकृत वाहनांबाबतची ही विशेष तपासणी मोहीम ३० जून २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय येथील वायुवेग पथकाद्वारे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम युद्धपातळीवर सुरू असून, भविष्यातही प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि करचुकवेगिरीस आळा घालण्यासाठी अशा प्रकारची कडक कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहील, अशी माहिती लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.




हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.